MHBH090013172022

# न्यायनिर्णय

(दिनांक ०४/०४/२०२३ ला पारीत)

१. सदरचे प्रकरण आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ६५(ई) च्या गुन्ह्याकरिता चालविण्यात आले. अभियोगपक्षातर्फे सरकारी विधीज्ञ श्रीमती सी. एन. रामटेके व आरोपीकरिता विधीज्ञ श्री डी. एम. गहाणे यांना ऐकले. अभिलेखावरील उपलब्ध कागदपत्र व पुराव्याच्या आधारे न्यायालयाच्या विचारार्थ निघालेले प्रश्न व त्यावर माझे निष्कर्ष कारणांसह खालीलप्रमाणे दिले आहे.

| विचारार्थ प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|
| १ अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की, दिनांक ३१/०८/२०२२ रोजी सायंकाळी १७.३० वाजता दरम्यान मौजा पाथरी येथुन आरोपीच्या ताब्यातुन विना परवाना २०० कि. सडवा मोहपास मिळुन आला व त्याद्वारे आरोपीने महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ६५(ई) प्रमाणे गुन्हा केला? | ........नाही. |
| २ आदेश काय ? | ... आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात येते. |

## कारणमिमांसा

२. आरोपीविरुध्द आरोप सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाने महेंद्र हरिचंद्र कापगते (अ. सा.क्र.१) यांची साक्ष नोंदविली. त्यानंतर निशाणी क्र. १ वर आदेश करून अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. आरोपीने त्याचे बचावात स्वत:ची किंवा इतर व्यक्तीची साक्ष नोंदविली नाही.

**विचारार्थ प्रश्न क्र. १ बाबत** :—

३. आरोपाला अनुसरुन अभियोगपक्षाने महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ६५(ई) प्रमाणे आरोपीने विना परवाना अवैधरित्या सडवा मोहपास बाळगला, हे सिध्द करणे बंधनकारक आहे.

४. पंच साक्षदार महेंद्र (अ.सा.क्र.१) याने त्याचे साक्षेत कथन केले की, घटना कधीची आहे हे त्याला माहित नाही. घटना काय झाली होती हे त्याला माहित नाही. पोलीसांनी त्याला पंचनाम्याच्या कार्यवाहीसाठी कुठेही बोलाविले नाही. पोलीसांनी त्याचेसमक्ष काहीही कार्यवाही केली नाही. पोलीसांनी त्याचेसमक्ष कोणतीही कार्यवाही केली नाही. पोलीसांनी त्याचेसमक्ष काहीही जप्त केले नाही. पोलीसांनी त्याची सही पाथरी येथील मालाधरे यांच्या पानठेल्यावर कागदावर घेतली. घ टनास्थळ व जप्ती पंचनाम्यावर त्याची सही आहे. त्यातील मजकुर त्याला माहित नाही.

५. अभिलेखाचे अवलोकन केले असता, त्यामध्ये रासायनिक विश्लेषणाचा अहवाल

अभिलेखावर दिसुन येत नाही. तसेच अभियोगपक्षाने रासायनिक पृथक्करण अहवाल मिळविण्याकरिता कोणतेही प्रयत्न केल्याचे दिसुन येत नाही. अभियोगपक्षाने सदरचा अहवाल दाखल न करण्यामागचे कारण देखील विशद केलेले नाही. अभिलेखावर रासायनिक विश्लेषणाचा अहवाल नसल्यामुळे जप्त केलेला मुद्देमाल सडवा मोहपासच होता, असे म्हणणे उचित होणार नाही. त्यामुळे आरोपी जवळुन पोलीसांनी सडवा मोहपास जप्त केला, ही बाब अभियोगपक्षाने संशयापलीकडे जाऊन सिध्द केली नाही. सदर बाबींच्या अभावामुळे व एकंदरित, वरिल विवेचनावरून आरोपीने महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ६५ (ई) प्रमाणे गुन्हा केल्याचे सिध्द होत नाही. अभियोगपक्ष आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यास असफल ठरला. त्यामुळे महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ६५ (ई) च्या गुन्हयाचे घटक सिध्द होत नाहीत. सबब विचारार्थ प्रश्न क्र. १ ला उत्तर नकारार्थी देत आहे.

<u>**विचारार्थ प्रश्न क्र. २ बाबत**</u> :—

६. आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोगपक्ष अपयशी ठरल्यामुळे, आरोपी हा सबळ पुराव्याअभावी निर्दोष होण्यास पात्र आहे. प्रकरणातील जप्त २०० कि. सडवा मोहपास पोलीसांनी घटनास्थळी नष्ट केल्याचे अभिलेखावरून दिसुन येते. फौजदारी संहिताचे कलम ४३७—अ अन्वये या न्यायनिर्णयाविरुध्द करण्यात आलेल्या अपील किंवा इतर कार्यवाहीमध्ये हजर राहण्याची हमी म्हणून आरोपीने जामीन देणे आवश्यक आहे. सबब विचारार्थ प्रश्न क्र.२ ला उत्तर म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

<u>**आ दे श**</u>

१. आरोपीला महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ६५(ई) च्या आरोपातून फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २५५(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपीचे बंधपत्र रद्द करण्यात येते.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७—अ च्या पुर्ततेकरिता रूपये ५०००/— चे बंधपत्र द्यावे.

४. प्रकरणातील ईतर जप्त मुद्देमाल असल्यास अपीलाचा कालावधी संपल्यानंतर कायद्यातील तरतुदीनुसार नष्ट करण्यात यावा.

५. न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.

स्वा/—
(के. पी. दवने)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
तुमसर.

तुमसर.
दिनांक: ०४/०४/२०२३.

## CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F. file judgment are same, word to word, as per the original judgment.

Name of the Stenographer :- P. B. Gajbhiye

Court’s Name :- Jt. Civil Judge Jr. Div.
& J. M. F. C., Tumsar..